सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## वक्फ बोर्ड विधेयक संदर्भातल्या बैठकीत सत्ताधाऱ्यांच्या १२ सुधारणा मंजूर : विरोधकांच्या सर्व सुधारणा फेटाळल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नवी दिल्ली**

प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकावर सखोल चर्चा करण्यासाठी ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. यावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. या वादानंतर बैठकीत समितिचे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांच्यावर हुकुमशाही कारभार करत असल्याचा आरोप विरोधी खासदारांकडून करण्यात आला. यावर गोंधळ घालणाऱ्या १० खासदारांना दिवसभरासाठी निलंबितही करण्यात आलं.



यानंतर आज झालेल्या संयुक्त समितीच्या बैठकीत या विधेयकासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या असून विरोधी खासदारांनी मांडलेल्या ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक २०२४ नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलं. हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे सविस्तर चर्चेसाठी पाठवण्यात आलं. यासंदर्भात समितीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या तर ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या. मंजूर करण्यात आलेल्या १२ सुधारणा या सत्ताधारी भाजपा आणि एनडीए आघाडीतील इतर मित्रपक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या. तर फेटाळण्यात आलेल्या ४४ सुधारणा या विरोधी पक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या.

**कोणत्या सुधारणा मंजूर झाल्या?**

दरम्यान, जगदम्बिका पाल यांनी आज मंजूर झालेल्या सुधारणांपैकी काही सुधारणांचा उल्लेख केला. आज एक सुधारणा मंजूर करण्यात आली. आधी जमिनीच्या मालकीसंदर्भात निर्णय घेण्याबाबतचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे होते. आता राज्य सरकारमार्फत नेमलेल्या व्यक्तीकडे हे अधिकार असतील. मग ती व्यक्ती आयुक्त असो वा सचिव, असं पाल यांनी सांगितलं.

याव्यतिरिक्त आणखी एक सुधारणा मंजूर करण्यात आली. ही सुधारणा वक्फ बोर्डाच्या रचनेसंदर्भात आहे. आधी वक्फ बोर्डावर दोनच सदस्य होते. सरकारकडून दोनऐवजी तीन सदस्य असावेत असं सुचवण्यात आलं. यामध्ये एका इस्लाम अभ्यासकाचाही समावेश असेल. विरोधकांनी यालाही विरोध केला, असं पाल म्हणाले.

## एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट आक्रमक

### संभाजीनगर जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७छत्रपती संभाजीनगर**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा स्थापन झालेल्या महायुती सरकारने एसटी महामंडळाच्या तिकीट दरामध्ये वाढ केली आहे. या निर्णयाविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने राज्यभरात आंदोलन करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता राज्यातील प्रमुख एसटी डेपोजवळ हे चक्काजाम आंदोलन होणार आहे. या माध्यमातून एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजच चक्काजाम आंदोलन करण्यात आले. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्त्वात हे आंदोलन झाले. या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



राज्यातील सर्वसामान्य जनतेला एसटी महामंडळाने केलेली भाडेवाढ परवडणारी नाही. दुसरीकडे तुम्ही वायफळ खर्च करत आहात आणि एसटीची भाडे वाढ करता? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. त्यामुळे एस टी महामंडळाने केलेली भाडेवाढ रद्द करणेच योग्य होईल. नसता ही सर्वसामान्य प्रवाशांवर अन्यायकारक असा हा निर्णय असेल, असे देखील दानवे यांनी म्हटले आहे. अजित पवार हे देखील भाडेवाडीच्या विरोधात बोलत आहेत. तर मग अशावेळी ते अर्थमंत्री आहेत, त्यांनी भाडेवाढ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली. परिवहन मंत्री भाडेवाढ झालेले मलाच माहीत नसल्याचे सांगत आहेत. मग सरकारमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे.

## अमित शाह यांचं त्रिवेणी संगमावर शाही स्नान, मुख्यमंत्री योगीही होते उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७प्रयागराज**

देशात सध्या उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये सुरु असलेल्या महाकुभमेळ्याची खूपच चर्चा आहे. रोज येथे लाखोंच्या संख्येने भाविक येत आहेत. त्यातच सोमवारी गृहमंत्री अमित शाह यांनी प्रयागराजमध्ये पोहोचून महाकुंभ २०२५ मध्ये सहभाग घेतला आणि अतिशय श्रद्धापूर्वक शाही स्नान केले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह गृहमंत्र्यांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केले. त्याचा व्हिडीओही व्हायरल झाला.

अमित शाह यांनी सकाळीच सोशल मीडिया हँडल द वर पोस्ट करत म्हटले होते की, कुंभ हे समरसतेवर आधारित जीवनाचे आपले शाश्वत तत्वज्ञान आहे. आज मी प्रयागराज या धार्मिक नगरीमध्ये एकता आणि अखंडतेच्या या महान उत्सवात संगमात स्नान करण्यासाठी आणि संतांचे आशीर्वाद घेण्यासाठी जाणार आहे. त्यासाठी मी उत्सुक आहे. प्रयागराज येथे पोहोचल्यावर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने त्यांचे पुष्पहार अर्पण करून भव्य स्वागत केले.



दरम्यान, महाकुंभ मीडिया सेंटरने गृहमंत्री अमित शाह २७ जानेवारीला महाकुंभला पोहोचणार असल्याबाबत एक प्रसिद्धीपत्रक जारी केले होते. या प्रसिद्धीपत्रकानुसार, अमित शाह प्रथम प्रयागराजला पोहोचतील आणि त्रिवेणी संगम येथे गंगेत स्नान करतील. यानंतर ते बडे हनुमानजी मंदिर आणि अक्षय वट येथे जातील. यासोबतच ते महाराज आणि इतर संतांसोबत भोजन करतील आणि जुना आखाड्याला भेट देतील. धर्मनगरीच्या भेटीदरम्यान ते गुरू शरणानंद जी यांच्या आश्रमात जाऊन गुरू शरणानंद जी आणि गोविंद गिरी जी महाराज यांची भेट घेतील. यानंतर ते शृंगेरी, पुरी आणि द्वारकाच्या शंकराचार्यांचीही भेट घेतील. त्यानंतर अमित शाह संध्याकाळी दिल्लीला रवाना झालेत .

## आता गुन्ह्यातील पुरावा टेम्पर करणं अवघड; आरोपींना घाम फोडणारी यंत्रणा फडणवीसांकडून लॉन्च

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

एखादी गुन्हेगारीची घटना घडल्यानंतर त्याच्या शेवटापर्यंत पोहचण्यासाठी आणि त्याचा छडा लावण्यासाठी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी कंबर कसली आहे. गुन्ह्यातील आरोपींपर्यंत पोहचवण्यासाठी आणि आवश्यक पुरावे गोळा करणाऱ्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण करण्यात आले आहे. यामुळे घडलेल्या गुन्ह्यांमध्ये महत्त्वाचे पुरावे एकत्र गोळा करण्यास आणि गुन्ह्यांचा छडा लावण्यास मदत होणार आहे असे फडणवीसांनी सांगितले.





फडणवीस म्हणाले की, देशामध्ये केंद्र सरकारने नवीन भारतीय साक्ष अधिनियल लागू केलेला आहे. या कायद्याने साक्ष गोळा करणे. त्याची व्यवस्था योग्यप्रकारे करणं. एखाद्या गुन्ह्यातील पुरावे गोळा करणे ते व्यवस्थित स्टोअर करून ठेवणे यासाठी काही नवीन नियम सुरू केले आहेत. त्या नियमाच्या अंतर्गत महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्याने याला अनुकुल अशा मोबाईल फॉरेनसिक व्हॅन्स तयार केलेल्या आहेत. या प्रत्येक फॉरेन्सिक व्हॅनमध्ये वेगवेगळ्या प्रकारचं साहित्य त्या ठिकाणी असणार आहे. तसेच यात एक सायंटिफिक एक्सपर्ट आणि केमिकल एक्सपर्ट ज्यांना फॉरेन्सिक एक्सपर्टचा दर्जा आहे ते उपस्थित असणार आहे.

लोकार्पण करण्यात आलेल्या सर्व व्हॅन्समध्ये सीसीटीव्ही, फ्रिज देखील बसवण्यात आले आहे. यामुळे ज्या तापमानावर पुरावे, यंत्र किंवा परिक्षण करण्याचे केमिकल्स ठेवायची आहेत ते ठेवता येणार आहेत. एवढेच नव्हे तर, सगळं योग्यप्रकारे सील होतयं की नाही हे कॅमेरांमुळे पाहता येणार आहे. तसेच घटनेच्या ठिकाणी फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीदेखील करता येणार आहे. यामुळे घडलेले गुन्हे उघडकीस येणं आणि आरोपींना शिक्षा होणं या दोन्हीमध्ये एक गुणात्मक बदल होणं पाहण्यास मिळेल असा विश्वास फडणवीसांना व्यक्त केला. जवळपास २५६ व्हॅन्स तयार केल्या जाणार असून, त्यातील २१ व्हॅन्स रोलआऊट केल्या असल्याचे फडणवीसांनी सांगितले.

**जागेवरचं होणार टेस्टिंग**

गुन्हा घडलेल्या ठिकाणी जाऊन पहिल्यांदा ते क्राईम सीन ताब्यात घेतील आणि तेथील जो पुरावा आहे तो ते जमा करतील. यामध्ये ब्लड सॅम्पल, नार्कोटिक, स्फोटाचे सॅम्पल किंवा वेगवेगळ्या प्रकारचे जे काही पुरावे असतील या प्रत्येकाचे जागेवर टेस्टिंग करण्याचे कीट या व्हॅन्समध्ये आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारे आपल्याला अनेक केसेसमध्ये योग्य पुरावे नाही म्हणून जे काही गुन्हेगार सुटताना दिसतात तसे यामध्ये होणार नाही. तर, यातील किट्सच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना प्राथमिक निष्कर्ष काढता येईल आणि अंतिम निष्कर्षदेखील काढता येईल.

## लाडक्या बहिणींच्या कामाची बातमी, निकषात न बसणाऱ्या अर्जाबाबत सरकारचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

केंद्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली आहे. लाडकी बहीण योजनेत महिलांना दर महिन्याला आर्थिक मदत केली जाते. या योजनेबाबत अनेक चर्चा होत आहेत. ज्या महिला अपात्र आहेत. त्यांच्याकडून पैसे परत घेणार असल्याची माहिती समोर आली आहे.मात्र, या योजनेत कोणत्याही महिलांकडून जबरदस्तीने परत घेतले जाणार नसल्याने महिला व बालविकास विभागाने सांगितले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत लाभार्थी महिलांकडून त्यांना दिलेला लाभ शासनाकडून परत घेण्यात



येत आहे अथवा घेण्यात येणार असल्याबाबत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या वस्तुस्थितीत धरुन नाहीत, असं महिला व बालविकास विभाग सचिव अनुपकुमार यादव यांनी सांगितले आहे.

लाडकी बहीण योजनेत अनेक महिलांनी अर्ज माघारी घेतले आहेत. त्याचसोबत स्वेच्छेने लाभार्थी रक्कम परत केली आहे. आतापर्यंत हजारो महिलांनी पैसे परत केले आहेत. तसेच ज्या महिलांना पुढील कालावधीत लाभ नको असल्याबाबत अनेक महिला स्वतः सांगत आहेत. अशा महिलांना लाभ देण्यात येणार नाही. लाभार्थी महिलांकडून रक्कम परत घेण्याबाबत कोणतीही सक्ती शासनाकडून करण्यात येत नाही, असंही त्यांनी सांगितले.

## अजित पवारांकडे पुरावे देणार, मुंडेंची आमदारकीही रद्द झाली पाहिजे; अंजली दमानिया आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील वातावरण ढवळून निघालं. संतोष देशमुख यांना न्याया मिळावा, या मागणीसाठी सर्वपक्षीय मोर्चे निघत आहेत. या प्रकरणातील मुख्य सुत्रधार असल्याचा ज्या वाल्मिक कराडवर आरोप होतोय, तो मंत्री धनंजय मुंडेंच्या जवळचा असल्याचं बोलल्या जातंय. त्यामुळं मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होतेय. आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केलीय.



अजित पवारांनी धनंजय मुंडेच्या विरोधात पुरावे हवेत आहेत, तर ते द्यायला मी तयार आहे, त्यांनी मला भेटीसाठी वेळ द्यावी, मुंडेंच मंत्रिपद काय तर आमदारकीही रद्द झाली, अशी मागणी दमानिया यांनी केली.

संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राज्यातील वातारवण चांगलचं तापलं. भाजप आमदार सुरेध धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही हे प्रकरण उचलून धरलं. दमानिया यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर एक पोस्ट लिहून मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यांनी लिहिलं की, धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या, ही मागणी करण्यासाठी मी अजित पवारांना भेटण्याची वेळ मागितली आहे. अजित पवार आणि माझा ३६ चा आकडा आहे, त्यांच्या भ्रष्टाचारा विरुद्ध मी सातत्याने लढत आहे आणि मरेपर्यंत लढत राहीन, पण बीडचे जे कृत्य केले गेले ते माणुसकीला काळिमा फासणारे आहे. अशा हैवाण लोकांना थारा देणाऱ्या आणि मोठं करणाऱ्या मंत्र्याचा (धनंजय मुंडेंचा) ताबडतोब राजीनामा घ्यायला हवा होता, असं दमानिया यांनी म्हटलं.

## बिएमसी निवडणुकीपूर्वी उद्धव ठाकरेंना मोठा धक्का, बड्या महिला नगरसेविकेने साथ सोडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ मुंबई**

विधानसभा निवडणुकीनंतर आता सर्वांनाच वेध लागले ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, महापालिका निवडणुकांचे. विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटाकडून महापालिका निवडणुकांची तयारी देखील सुरू झाली आहे. मुंबई महापालिकेत स्वतंत्रपणे उमेदवार देण्याची घोषणाच खासदार संजय राऊत यांनी केली आहे. त्यामुळे, महापालिका निवडणुकांसाठीची मोर्चबांधणी सुरू झाली असून आजच पुण्यात बैठक घेण्यात आली आहे. दुसरीकडे शिवसेना शिंदे गटानेही कंबर कसली असून ऑपरेशन टायगर सुरू केल्याचं मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वीच सांगितलं होतं. त्या अनुषंगाने ठाकरे गटाला धक्का देत काही नेत्यांचा हाती शिवधनुष्य देऊन उद्धव ठाकरेंना धक्का दिला जात आहे. त्यातच, आता आगामी महापालिका निवडणुकांपूर्वीच ठाकरेंना मुंबईत मोठा धक्का बसला आहे. आता, महिला उपनेत्यानंच ठाकरेंची साथ सोडली असून लवकरच शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.



शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या, विधानसभा महिला संघटक आणि माजी नगरसेवक राजुल पटेल शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. राजुल पटेल यांनी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून यावेळी उमेदवारी मागितली होती. मात्र, त्यांच्याऐवजी हारून खान यांना शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली होती.

## संपादकीय ......

# कर्तव्यपथावरून..!

भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात येऊन देशात लोकशाहीचे नवे पर्व सुरू झाले. प्रजासत्ताक अस्तित्वात येण्याच्या एक दिवस अगोदरच म्हणजे २५ जानेवारीस निवडणूक आयोगाची स्थापना झाली आणि निवडणुका होऊ लागल्या. सारनाथ येथील अशोकस्तंभावरील तीन सिंहांचा उर्ध्वभाग, त्याच्या खालील धम्मचक्र, उजवीकडील वृषभ आणि डावीकडील घोडा हे घटक व त्याखालील उपनिषदातील 'सत्यमेव जयते' हा शब्दसमुच्चय अशी योजना केलेल्या त्रिमूर्तीचा भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह म्हणून २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकार केला गेला, तर २४ जानेवारी १९५० रोजी 'जनगणमन' हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आणि त्यासोबतच 'वंदे मातरम'ला राष्ट्रगान म्हणून मान्यता दिली गेली. आता प्रजासत्ताकाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू होत असून, भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. ते पूर्ण करण्यासाठी नीती आयोगाने एक रणनीती आखली आहे. यासाठी आयोग विविध शहरांची अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने मोहीम राबवणार आहे. सुरुवातीला मुंबई, सुरत, वाराणसी आणि विशाखापट्टणमच्या आर्थिक परिवर्तनासाठी तयार केलेल्या योजनेवर काम केले जाईल. त्यानंतर प्रमुख २० ते २५ शहरांच्या सुधारणेचे काम हाती घेतले जाईल. पूर्वी हा आयोग केवळ शहरांसाठी नगरनियोजन करत असे. आता शहरांसाठी आर्थिक योजना तयार करून ती वेगाने साकारण्यासाठी त्यावर काम सुरू झाले आहे. २०४७ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ३० ट्रिलियन डॉलरची बनवण्यासाठी नीती आयोगाने 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. त्यासाठी आयोगाकडे तरुणांकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत.'एआय' वापरून आयोग त्यावर काम करत असून, ही सर्व प्रक्रिया विद्यापीठे व अन्य शिक्षण संस्थांच्या मदतीने पूर्ण करण्यात आली आहे. बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेलसह नऊ महापालिकांचे मिळून जे 'एमएमआर' क्षेत्र बनले आहे, त्याचा जीडीपी ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. मागील १० वर्षांत भारताने झपाट्याने घोडदौड करून दाखवली आहे. ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे ३ कोटी घरे बांधली जाणार असून, पुढील ५ वर्षांत आणखी दोन कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. विकसित भारताच्या व्हिजनला चालना देत ५० वर्षांपेक्षा अधिक काळ व्याजमुक्त कर्जाच्या स्वरूपात १.३० लाख कोटी रुपयांचे भरीव वाटप राज्यांना केले जाणार आहे. प्राप्तिकर परतावा प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेस पूर्वी सरासरी ९३ दिवस लागत. आता केवळ १० दिवस लागतात. त्यामुळे करोडो प्राप्तिकरदाते समाधानी आहेत. एक कोटी कुटुंबांना घरावर सौरऊर्जा संच लावण्यासाठी सक्षम करण्याचे उद्दिष्टही असून, या योजनेतून दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळेल. माल वाहतुकीतील खर्च कमी करून कार्यक्षमता वाढवण्यासाठी 'पीएम गतिशक्ती'अंतर्गत तीन प्रमुख रेल्वे कॉरिडॉर कार्यक्रम राबवण्याची योजना आहे. माल तयार होऊन तो गोदामात धाडणे व तेथून गरजेनुसार विमानतळ किंवा बंदरापर्यंत पोहोचवणे यासाठी लागणारा वेळ व खर्च याद्वारे कमी होईल. ४० हजार रेल्वे डब्यांना 'वंदे भारत' मानकांमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे.देशात नागरी विमान वाहतुकीस चालना मिळावी आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात विमान प्रवास यावा, यासाठी केंद्र सरकारने उडान योजना सुरू केली. आणखी १०-२० वर्षांत या देशातील सामान्य माणूसही विमानाने फिरू शकणार आहे. म्हणूनच दुर्गम भागांत वा छोट्या शहरांतही विमानतळ बांधले जात आहेत. सागरमाला प्रकल्पांतर्गत जागतिक जहाजांच्या पुनर्बांधणी व्यवसायापैकी ६० टक्के व्यवसाय देशातच सुरू व्हावा, हे ध्येय आहे. यासाठी सरकारने 'रिसायकलिंग ऑफ शिप्स' हा कायदा केला असून, याद्वारे देशात एक कोटी नवे रोजगार निर्माण होणार आहेत. विकसित भारत २०४७ साठी 'लवचिक ग्रामीण भारता'ची उभारणी ही संकल्पना समोर ठेवून, दिल्लीत 'ग्रामीण भारत महोत्सव' नुकताच भरवण्यात आला. ग्रामीण भागात शहरी दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. महात्मा गांधी यांनी भारत खेड्यात राहतो आणि शेवटच्या व्यक्तीस दारिद्र्यमुक्त करणे हे ध्येय आहे, असे म्हटले होते. सरकारने स्वच्छ भारत मिशनअंतर्गत प्रत्येक घरात शौचालय बांधून दिले. पक्की घरे देऊन जलजीवन मिशनअंतर्गत करोडो घरांना सुरक्षित आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात आहे.ई-संजीवन टेलिमेडिसिन उपक्रमाद्वारे गावांमधील लोकांना सर्वोत्तम डॉक्टर आणि रुग्णालयांची सेवा दिली जात आहे. देशातील ९००० शेतकरी उत्पादक संघटनांना अर्थसाह्य दिले जात आहे. ग्रामस्थांना मालमत्तांची कागदपत्रे वितरित करण्यासाठी 'स्वामित्व योजना' सरकारने हाती घेतली आहे. मुद्रा, स्टार्टअप इंडियासारख्या योजनांमुळे तरुणांना पाठबळ मिळत आहे. शेतीशिवाय लोहारकाम, सुतारकाम, कुंभारकाम यासारखी पारंपरिक कला-कौशल्याची कामे गावखेड्यांमध्ये केली जातात. त्यांच्या कौशल्यवर्धनासाठी विश्वकर्मा योजना राबवली जाते. ग्रामीण भागातील बहुसंख्य दलित, आदिवासी, ओबीसी यांचे जीवन सुसह्य झाल्यास त्यांना शहरात येण्याची गरजच उरणार नाही. थोडक्यात, समृद्ध आणि विकसित भारत साकारण्यासाठी कल्पक योजना व उपक्रम राबवले जात आहेत; पण या कामाला राज्यांचे सहकार्य मिळणे तितकेच गरजेचे आहे. केवळ विरोधी पक्षांचे सरकार राज्यात आहे, तेथे केंद्रीय योजना राबवल्या जात नाहीत, असे नाही, तर काही भाजपशासित राज्येही योजना प्रभावीपणे राबवत नसल्याचे वास्तव आहे. इस्रायल, जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, थायलंड यासारख्या देशांनी प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने व गतिमानतेने प्रगती साधली. त्यासाठी सर्व काही सरकारने करावे, या वृत्तीचा त्याग केला पाहिजे. सामाजिक शिस्त, सचोटी, कार्यक्षमता हा आमच्या संस्कृतीचा भाग बनला पाहिजे. केवळ 'भारत माता की जय' म्हणून देशभक्ती सिद्ध होत नाही. त्यासाठी जनतेनेही कर्तव्यपालनाच्या पथावरून निर्धारपूर्वक चालत राहिले पाहिजे.

# गांडूळ खत देईल साथ; उत्पादनात करा वाढ सोबत मातीचा होईल विकास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ कृषी विशेष**



गांडूळ खत हे एक पर्यावरणपूरक आणि प्रभावी खत आहे. गांडूळ खत हे गांडूळांच्या माध्यमातून शेणखतावर प्रक्रिया करून तयार होते. जे मातीला आवश्यक असलेले पोषक तत्त्व देण्यास मदत करते.

रासायनिक खतांच्या तुलनेत गांडूळ खत मातीला अधिक सुपीक बनवते. गांडूळ खताच्या वापरामुळे मातीचे आरोग्य सुधारते तसेच पिकांच्या उत्पादनात वाढ होते. गांडूळ खताचे फायदे अनेक आहेत ज्यातील काही फायदे पुढीलप्रमाणे.

मातीची उत्पादकता वाढवते

गांडूळ खतामुळे मातीतील पोषक तत्त्वांचे संतुलन राखण्यास मदत होते. तसेच माती अधिक सुपीक आणि उत्पादनक्षम होते.

मातीची पोत सुधारतो

गांडूळ खतामुळे मातीमध्ये हवा आणि पाणी चांगले मिसळतात ज्यामुळे मातीची जलधारण क्षमता आणि संरचना सुधारते.

संपूर्ण पोषण

गांडूळ खताद्वारे मातीला नायट्रोजन, फास्फोरस, पोटॅशियम आणि इतर महत्त्वपूर्ण पोषक तत्त्व पुरविले जातात. परिणामी पिकांची जलद योग्य वाढी दिसून येते.

मातीतील सूक्ष्मजीवांचे रक्षण

गांडूळ खत मातीतील सूक्ष्मजीवांचा विकास वाढवतो ज्यामुळे मातीच्या जैविक समतोल अबाधित राहते.

पर्यावरणपूरक खत

ंडूळ खत रासायनिक खतांपेक्षा पर्यावरणासाठी अधिक सुरक्षित आहे. यामुळे पिकांचे उत्पादनही निरोगी आणि सुरक्षित राहते.

कमी खर्चात अधिक फायदा

शेतकऱ्यांना रासायनिक खतांपेक्षा कमी खर्चात गांडूळ खत तयार करता येते किंवा विकत घेता येते ज्यामुळे पिकांच्या उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाणही वाढते.






# यंदा दोन शेतकऱ्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला, कोण आहेत हे शेतकरी? वाचा सविस्तर

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक-** केंद्र सरकारने २०२५ च्या पद्म पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा केली आहे. या यादीत अनेक अनामिक आणि अद्वितीय पद्म पुरस्कार विजेते आहेत, ज्यात दोन प्रयोगशील शेतकऱ्यांचा समावेश आहे. नोकलाकचा फळांचा मसीहा म्हणून ओळख असलेले एल हँगथिंग आणि सफरचंद सम्राट हरिमन शर्मा यांचा समावेश आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला केंद्र सरकारने २०२५ च्या पद्म पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा केली. यावर्षी, भारत सरकारने १३९ पद्म पुरस्कारांना मान्यता दिली आहे, ज्यामध्ये ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये २३ महिला आहेत, तर परदेशी/एनआरआय/पीआयओ/ओसीआय श्रेणीतील १० आणि मरणोत्तर १३ पुरस्कार विजेत्यांचा समावेश आहे. तसेच या यादीत एल हँगथिंग आणि हरिमन शर्मा या शेतकऱ्यांचा समावेश आहे.

प्रगतीशील शेतकरी एल हँगथिंग कोण आहे?

एल हँगथिंग हे नागालँडमधील नोकलाक जिल्ह्यातील एक प्रगतीशील शेतकरी आहेत, ज्यांना नोकलाकचा फळांचा मसीहा म्हणून ओळखले जाते. ते गेल्या ३० वर्षांपासून त्याच्या परिसरात स्थानिक नसलेल्या फळांची लागवड करत आहे आणि त्याने हे ज्ञान ४० गावांमधील ४०० हून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले आहे.





लहानपणी ते टाकून दिलेल्या फळांपासून बिया गोळा करायचे आणि त्याच्या शेतात लागवड करायचे, ज्यामुळे त्यांना फळांची आवड निर्माण झाली. त्यांच्या नवीन शेती तंत्रांचा ४०० हून अधिक शेतकऱ्यांनी अवलंब केला आहे. त्यांनी लिची आणि संत्री यांसारख्या स्थानिक नसलेल्या फळांची लागवड करून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळवून दिले आहे, ज्यामुळे ४० गावांमधील हजारो शेतकऱ्यांना सक्षम बनवले आहे.

प्रगतीशील शेतकरी हरिमन शर्मा कोण आहेत?

हरिमन शर्मा हे हिमाचल प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यातील घुमरवी तहसीलमधील एक प्रगतीशील शेतकरी आहेत. २००५ मध्ये, त्यांनी सफरचंदाची एक नवीन जात विकसित केली, जी सखल भागात देखील वाढवता येते. बर्फाळ टेकड्यांवर वाढणारे सफरचंद हिमाचल प्रदेशच्या खालच्या उष्ण भागातही पिकवता येते असे यापूर्वी कोणीही विचार केला नव्हता.

पण हरिमन शर्मा यांनी सफरचंदाची एक नवीन जात, क्ळचछ ९९ विकसित केली, जी ४० ते ४६ अंश तापमान असलेल्या भागात देखील वाढवता येते. त्यांनी या जातीचे पेटंटही त्यांच्या नावावर घेतले आहे. हे सफरचंद आकार, गुणवत्ता आणि चवीमध्ये पारंपारिक सफरचंदासारखेच आहे आणि आता ते सखल भागात म्हणजे सपाट भागातही यशस्वीरित्या घेतले जाऊ शकते.




## योग्य पद्धतीने औषधे घेतली तरच त्याचा योग्य परिणाम होतो

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्याला लवकर बरे व्हायचे असेल तर योग्य पद्धतीने औषधे घेतली तरच त्याचा योग्य परिणाम होतो. चुकीच्या पद्धतीने औषधे घेतल्यास उपयोगापेक्षा त्रासच होण्याची शक्यता असते. अनेकदा काही व्यक्ती पाणी न पिता नुसतेच गोळ्या, औषधे गिळतात किंवा अगदी एकच घोट पाणी पितात. आपल्यापैकी कोणालाही अशी सवय असेल तर वेळीच सावध व्हा.



अन्ननलिकेला त्रास : बिन पाण्याचे औषध घेतल्यास अन्ननलिकेला नुकसान होऊ शकते.


छातीत वेदना आणि जळजळ : गोळी मोठ्या आकारातील असेल आणि ती पाण्याशिवाय घेण्याचा प्रयत्न केल्यास अन्ननलिकेत तसेच छातीत वेदना आणि जळजळ होऊ शकते.

श्वास घेण्यास अडचण : अन्ननलिका खूप नाजूक पेशींनी तयार होते. गोळी अन्ननलिकेत अडकली तर घशाला त्रास होतोच शिवाय ते प्राणघातकही ठरू शकते. पाण्याविना गोळ्या गिळल्यास अन्ननलिकेत अल्सर होण्याची शक्यता खूप जास्त असते. एका अभ्यासानुसार कोणत्याही प्रकारच्या औषधामुळे अन्ननलिकेत अल्सर होऊ शकतो.

पाण्याबरोबर गोळी खाल्ल्यास ती लवकर विरघळते असा एक समज आहे; मात्र त्यात फारसे तथ्य नाही. औषध योग्य जागी पोहोचवणे हे पाण्याबरोबर गोळी खाण्याचे खरे कारण आहे. औषधे घेताना कोणत्या स्थितीत आहात याकडेही लक्ष द्यायला हवे. गोळी घेताना ती शांतपणाने बसूनच घ्यावी. जेवणापूर्वी किंवा जेवण झाल्यानंतर किमान १५ मिनिटांनंतरच गोळ्या-औषधे घ्यावीत. गोळी घेतल्यानंतर किमान १५ मिनिटे झोपू नये. कोणतीही औषधे घेताना वैद्यकीय सल्ला आणि औषधांची एक्स्पायरी डेट या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात, हे कधीही विसरू नये.

# वातावरण बदलाने हरभरा पिकावर अळीचा प्रकोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोर्शी** खरीप हंगामात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बीत हरभरा पिकाची मोठ्या अपेक्षेने लागवड केली. शेतशिवारात हरभरा पीक फुलोऱ्यात असतानाच वातावरण बदलामुळे अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. कोणते औषध फवारावे, याबद्दल शेतकऱ्यांना कृषी विभागाकडूनही मार्गदर्शन मिळत नाही. यामुळे उत्पन्नात घट होण्याची भीती आहे.यंदा जेवढे घाटे तितक्याच अळ्यांचा प्रादुर्भाव दिसत आहे. महागडी औषधांची फवारणी किती वेळा करावी, या चिंतेत शेतकरी आहे. काही शेतकरी भिंगरीची फवारणी करून अळीचा प्रादुर्भाव कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. औषधाबद्दल कृषी विभागाकडून मार्गदर्शन मिळत नाही. प्रशिक्षण, मेळावे काहीच घेतले जात नाही. अधिकारी, कर्मचारी बांधावरही येत नाही.


shutterstock.com · 2250380983

शेतकरी संकटाने होळपळून निघत आहे. त्याला कुणीही वाली नाही. कृषी विभागाचा एकही अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर येत नाही. मार्गदर्शनही मिळत नाही. परिणामी शेतकरी कृषी केंद्र चालकाच्या सल्ल्याने औषधी फवारणी करून उपाययोजनेचा प्रयत्न करीत आहे.

**गजानन जाधव,** शेतकरी.

# अमृत कलश, उत्सव, अमृत वृष्टी... यापैकी कोणत्या स्पेशल FD मध्ये सर्वाधिक व्याज, कुठे गुंतवू शकता पैसा?

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक-** भविष्याच्या दृष्टीनं गुंतवणूक ही महत्त्वाची आहे. अनेक जण उत्तम परताव्यासह सुरक्षित गुंतवणूकीचा पर्याय स्वीकारत असतात. त्यामुळे आजही अनेकांची एफडीला पसंती आहे. परंतु गेल्या काही काळात शेअर बाजारातील गुंतवणूकीचा ओघही वाढलाय. परंतु गुंतवणूकदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी अनेक भारतीय बँकांनी उच्च व्याजदरासह विशेष एफडी योजना सुरू केल्यात. स्टेट बँक ऑफ इंडिया (डइख), इंडियन बँक, आयडीबीआय बँक आणि पंजाब अँड सिंध बँक या बँकांमध्ये याचा लाभ घेता येईल. त्यामध्ये गुंतवणुकी साठी ठराविक कालमर्यादा असते. या योजनांविषयी आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

एफडी म्हणजेच फिक्स्ड डिपॉझिट हा गुंतवणुकीचा सुरक्षित आणि विश्वासार्ह मार्ग मानला जातो. परंतु, म्युच्युअल फंड आणि शेअर बाजाराच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे एफडीमधील गुंतवणूक कमी झालीये. ही तूट भरून काढण्यासाठी बँकांनी तात्पुरत्या स्वरूपात विशेष एफडी योजना सुरू केल्यात. या योजनांमध्ये ग्राहकांना अधिक व्याज मिळतं.

**अमृत कलश आणि अमृत सृष्टी-** एसबीआयनं 'अमृत कलश' आणि 'अमृत सृष्टी' या दोन नवीन स्कीम्स सुरू केल्या आहेत. ४०० दिवसांसाठी सर्वसामान्य नागरिकांसाठी ७.१० टक्के आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७.६ टक्के व्याजदर आहे. ४४४ दिवसांसाठी सर्वसामान्य नागरिकांना ७.२५ टक्के आणि ज्येष्ठ नागरिकांना ७.७५ टक्के व्याजदर दिला जात आहे. या दोन्ही स्कीम्समध्ये अतिज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ०.१० टक्के व्याज मिळणारे. या योजनांमध्ये ३१ मार्च २०२५ पर्यंत गुंतवणूक करता येईल.




**उत्सव कोलेबल एफडी-** आयडीबीआय बँकेच्या 'उत्सव कॉलेबल एफडी' योजनेत वेगवेगळ्या कालावधीसाठी वेगवेगळे व्याजदर आहेत. ५५५ दिवसांसाठीच्या एफडीसाठी सर्वसामान्यांना व्याजदर ७.४० टक्के आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७.९० टक्के व्याज दिलं जात आहे. या योजनेत गुंतवणूक करण्याची शेवटची तारीख ३१ मार्च २०२५ आहे.

**या योजनाही फायदेशीर आहेत-** इंडियन बँकेनं आपल्या 'आयएनडी सुप्रीम ३०० डेज' आणि 'आयएनडी सुपर ४०० डेज' योजनांना ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. आयएनडी सुपर ४०० डेज योजनेत सर्वसामान्यांसाठी ७.३० टक्के, ज्येष्ठ नागरिकांसाठी ७.८० टक्के आणि अतिज्येष्ठ नागरिकांसाठी ८.०५ टक्के व्याज दिलं जात आहे. 'आयएनडी सुप्रीम ३०० डेज' योजनेवर ७.०५ टक्के व्याज दर आहे.

**पंजाब अँड सिंध बँकेची स्पेशल एफडी-** पंजाब अँड सिंध बँक देखील विविध मुदतीच्या विशेष एफडी योजना ऑफर करते. यामध्ये २२२, ३३३, ४४४, ५५५ (कॉलेबल), ५५५ (नॉन-कॉलेबल), ७७७, ९९९ (कॉलेबल) आणि ९९९ (नॉन-कॉलेबल) दिवसांचा कालावधी आहे. या योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण




## क्रीडा संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात, चित्ररथांनी नागरिकांचे वेधले लक्ष

# प्रत्येक भारतीयासाठी संविधान महत्त्वाचे

**– राज्यमंत्री इंद्रनिल नाईक**







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना घटनात्मक अधिकार दिले आहे. संविधान प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाचे आहे, त्यामुळे संविधानाचे प्रत्येकाने वाचन करावे, असे आवाहन उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले. जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.श्री. नाईक म्हणाले, स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने देश स्वतंत्र झाला. त्यानंतर भारतीय संविधानाच्या रूपाने देशाला अमूल्य देणगी मिळाली आहे. संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला अधिकार मिळाला असल्यामुळे प्रत्येकाने संविधानाचे वाचन करावे. संविधानाचा आदर राखून राज्य शासन विविध घटकांसाठी कार्य करीत आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आणि वाजवी दरात बियाणे, खते उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच केवळ एक रूपयात विमा काढण्यात आला आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामात १४६४ कोटी, तर रब्बीमध्ये १४८ कोटी रूपये वितरीत करण्यात आले आहे.

कृषीसाठी वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून जिल्ह्यात ८४० एकर शासकीय जमिनीवर सौर प्रकल्प उभारणी करण्यात येत आहे. यातून १८४ मेगावॅटचे सौर प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेतून ७८ हजार रूपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. जिल्ह्यातील पानपिंपळी आणि हरभरा पिकांना जीआय मानांकन प्राप्त झाले आहे.

महिलांना बचतगटाच्या माध्यमातून स्वयंपूर्ण करण्यात येत आहे. बचतगट उत्पादित वस्तूंच्या ब्रँडींग, पॅकेजिंगवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. जिल्ह्यातील ६०० महिलांना रोजगाराचे साधन देऊन स्वयंपूर्ण बनविण्यासाठी अनुदानावर पिंक ई–रिक्षा देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ ७ लाख महिलांना होत आहे. ९९ टक्क्याहून अधिक महिलांना योजनेचा लाभ मिळत आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून ५ हजार युवकांना १४ कोटी रूपयांचे विद्यावेतन देण्यात आले आहे. तसेच नांदगावपेठ अतिरिक्त एमआयडीसीमध्ये टेक्सटाईल्स पार्क निर्माण करण्यात आला आहे. याठिकाणी १३ मोठे उद्योग सुरु झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरवातीला ध्वजरोहनानंतर श्री. नाईक यांनी परेडचे निरीक्षण केले. सामाजिक न्याय विभागातर्फे संविधानाची प्रत आणि उद्देशिकेची भेट त्यांना देण्यात आली. यावेळी पोलिस, होमगार्ड, राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट गाईड पथक यांनी संचलन केले. यावेळी सामाजिक न्याय विभाग, महिला व बालविकास विभाग, कौशल्य विकास विभाग, जलद प्रतिसाद पथक, दामिनी पथक, अग्निशमन,परिवहन महामंडळ, श्वान पथक, शिवाजी संस्था, सामाजिक वनीकरण आदी विभागांच्या चित्ररथाने संचलन केले. मान्यवरांनी ग्रीस्टॅक चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविली. तसेच खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या खासदार निधीतून दिव्यांगांना तीनचाकी वाहनाचे वाटप करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.–

# प्रजासत्ताक दिनी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती –** जिल्ह्यात विविध क्षेत्रात कार्यरत आणि उल्लेखनीय यश मिळविणाऱ्यांचा राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथील प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यात हा कार्यक्रम पार पडला. जिल्ह्यातील सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनासाठी प्रयत्न करून १२६ टक्के निधी संकलित केल्याबद्दल जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचा सत्कार करण्यात आला. जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. योगेश निर्मळ यांच्या वतीने त्यांच्या पत्नी अपर्णा निर्मळ यांनी पुरस्कार स्विकारला. प्रवीण आखरे यांना जिल्हा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयातील जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे, योगेश पानझाडे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरविकास शाखेचे सहआयुक्त सुमेध अलोणे, महसूल सहायक एस. एम. काशीकर, सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, डॉ. सुरजकुमार मडावी, पोलीस विभागातील राम नागे, इक्बाल सैय्यद, सॉफ्टबॉल खेळाडू सौरभ टोकसे, जिम्नॅस्टिक हिमांशू जैन, वुशु क्रीडा प्रकारासाठी वैष्णवी बांडाबुचे, मध्यवर्ती कारागृह शिपाई सुधाकर मालवे, ग्रीस्टॅक प्रकल्पातील रमेश खुलसांजे, मिथून अंबाडकर, रमेश माहेकर, पंकज चकुले, सिद्धार्थ खडसे, मधुकर अंबाडकर, नाना यमगर, गजानन भुरे, प्रविण मेंढे, चंदन दातीर, रामराव इंगोले यांना गौरविण्यात आले.

# स्विमिंग टँकच्या पाण्यात सायकल चालवून केले ध्वजारोहण

## ११ फूट खोली, १ मिनिट ५१ सेकंद रोखला श्वास

### अमरावती येथील पोलिस कर्मचाऱ्याची कमाल







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती :** शहर पोलिस दलाच्या अमरावती जलतरण केंद्रावर आपल्या अचाट प्रयोगांनी नाव कमावलेले पोलिस कर्मचारी प्रवीण आखरे यांनी आणखी एक कारनामा केला. ११ फूट खोली आणि २१ मीटर अंतर असलेल्या स्विमिंग टँकमध्ये सायकल चालवित त्यांनी ध्वजारोहण केले. १ मिनिट ५१ सेकंदाच्या या कामगिरीदरम्यान ते एकदाही पाण्याच्या वर आले नाहीत. यादरम्यान उपस्थितांचा श्वास मात्र खाली–वर होत होता. प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या सोहळ्यात त्यांनी अशा आगळ्यावेगळ्या प्रकारे देशप्रेमाची अनुभूती अमरावतीकरांना दिली.प्रवीण दादाराव आखरे (४५) हे २५ वर्षांपासून पोलिस दलात कार्यरत आहेत. अमरावती जलतरण तलावाची ते धुरा सांभाळतात. यापूर्वीदेखील पाण्यावर तरंगत ५० प्रकारची योगासने करीत इंडिया व आशिया बूक रेकॉर्डमध्ये आपले नाव नोंदविले होते. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी ते ११ फूट खोलीच्या जलतरण तलावात सायकलीसह उतरले. त्या सायकलीवर बसून ते २१ मीटर लांबीच्या जलतरण तलावाच्या मध्यभागी पोहोचले आणि ध्वजारोहण केले. त्यानंतर ते दुसऱ्या टोकावर पोहोचले. या सुमारे दोन मिनिटांच्या कारनाम्यादरम्यान श्वासावर नियंत्रण ठेवून पाण्यात ते स्थिर राहिले. यावेळी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील, निवृत्त उपायुक्त पी.टी. पाटील यांच्यासह अन्य पोलिस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. हेल्मेटचे महत्त्व केले अधोरेखितप्रवीण आखरे यांनी पाण्यातही सायकलवर स्वार होताना हेल्मेट परिधान करून स्वत:ला अपघातापासून वाचविण्याचे आवाहन केले. पाण्यात त्यांची सायकल एकदाही वेडीवाकडी गेली नाही, हे विशेष.

आपत्तीच्या कार्यातही पुढाकारप्रवीण आखरे यांनी केवळ जलतरण तलावात पोलिस, युवकांना प्रशिक्षित केले नाही, तर आपत्तीच्या काळातही त्यांचा पुढाकार असतो. त्यांनी आतापर्यंत विविध जलाशयातून ७८ मृतदेह बाहेर काढले, तर अडकलेल्या ५५ जणांची सुखरूप सुटका केली.

# घरात ठेवलेल्या कापसाच्या थप्पीने त्वचेचा आजार

## भाव पडल्याने बळीराजा बेजार; व्यापारी मात्र मालामाल

### खुल्या बाजारात अल्प भाव : शेतकऱ्यांच्या अडचणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती –** यंदाही भाववाढीच्या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्री न करता घरात साठवून ठेवला आहे. मात्र घरात कापूस साठवल्यामुळे आरोग्य व इतर समस्यांचा सामना करावा लागत आहे. अशी स्थिती जिल्ह्यातील विविध तालुक्यांत दिसून येत आहे. एकीकडे भाव वाढत नाही, तर दुसरीकडे कापूस घरात ठेवल्याने त्वचेच्या आजारांचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी द्विधा मन:स्थितीत अडकला आहे.


### भाव ७ हजारांच्या पुढे सरकला नाही

चार वर्षापूर्वी कापसाला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता. जो नंतर ९ हजार रुपयांपर्यंत घसरला. त्यानंतरच्या काळात दर सातत्याने कमी होत गेले. सध्या कापसाचे दर ६ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटलच्या आसपास स्थिरावले आहेत. त्यामुळे आम्ही कापूस घरातच साठवून ठेवलेला आहे, अशी प्रतिक्रिया शेतकरी प्रकाश साबळे यांनी दिली.

### दोन रूमचे घर एक खोली कापसाने पॅक

जिल्ह्यातील काही कापूस उत्पादक शेतकऱ्यांची घरे दोन खोल्यांची असून, एका खोलीत पूर्ण कापूस भरून ठेवला आहे. परिणामी घरातील जागा अपुरी पडत आहे.लग्नसराईत खर्चाचा ताण वाढल्यामुळे कापूस विकणे अपरिहार्य झाले आहे.

जिल्ह्यात बहुतांश तालुक्यातकापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. खरीप हंगामात घेतलेल्या कापसाची वेचणी संपली असली तरी कमी भावामुळे शेतकऱ्यांनी तो साठवून ठेवला आहे. मात्र यामुळे कुटुंबातील लहान मुले आणि वृद्धांना त्वचेचे आजार होत आहेत. शरीराला कापसाचा स्पर्श झाला तर खाज सुटते, ज्यामुळे लहान मुले त्रस्त आहेत. तसेच गत तीन वर्षापासून कापसाच्या दरात वाढ झाली नाही. त्यामुळे हताश झालेले शेतकरी कमी भावातच कापसाची विक्री करीत आहेत. संक्रांत उलटली असली तरी अजूनपर्यंत बुल्या बाजारातील कापसाचे दर वाढलेले नाहीत. कापसाचे भाव केव्हा वाढणार, याकडे लक्ष लागले आहे.कुटुंबातील लग्नसराईच्या खर्चामुळे काही शेतकऱ्यांना आता कापूस कमी भावात विकणे भाग पडत आहे. कमी भावात शेतकरी कापूस विकत आहेत.



# काळजी कशाला? सामाजिक व न्याय विभागाची योजना

## संस्था व दाम्पत्यांनाही अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –** लेकीचा विवह म्हटला की, पारस्यांना सर्वविक सर्षाची चिंता सतावते. विवाह समारंभात होणाऱ्या खर्चामुळे कित्येक पालकांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येते. हा खर्च टाळण्यासह अनुचित रुढींना आळा घालण्यासाठी सामूहिक विवाहाची संकल्पना पुढे आली. सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून पार पडणाऱ्या मेळाव्यातून दाम्पत्यांनाही अनुदान दिले जाते. सामाजिक व न्याय विभागाच्या कन्यादान योजनेमुळे लेकीच्या लग्नाची काळजीही दूर झाली



आहे.

विवाह मुलाचा असो अथवा मुलीचा पालकांना सर्वाधिक चिंता खर्चाची असते. आर्थिक ऐपत नसताना उधारउसनवारी करून लग्न समारंभावर उधळपट्टी केली जाते. यात नातेवाईक नाराज होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागते. समाज काय म्हणेल, हा विचारही स्वस्थ बसू देत नाही. मागासवर्गीय समाज घटकांसाठी कन्यादान योजना राबविण्यात येते. नोंदणीकृत सामाजिक संस्थेच्या वतीने सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन केले जाते. यात सहभागी संस्था व विवाह करणाऱ्या दाम्पत्याला सामाजिक न्याय विभागाकडून अनुदान दिले जाते. यामुळे पालकांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येत नाही. वेळ, पैसाही वाचतो. यामुळे गरजू पालक सामूहिक विवाह मेळाव्यात आपल्या पाल्यांचे विवाह करण्याला पसंती देतात.

### कुणासाठी राबविली जाते कन्यादान अनुदान योजना

मागासवर्गीय कुटुंबांचा १ विवाहावर होणारा खर्च करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने कन्यादान योजना राबविण्यात येते.सामूहिक विवाह मेळावा ३ आयोजनासाठी पुढाकार घेणार संस्थेसह विवाह करणाऱ्या दाम्पत्याला अनुदान दिले जाते. आतापर्यंत अनेकांन सामूहिक मेळाव्यात विवाह करून अनुदानाचा लाभ घेतला आहे.

### अटी काय आहेत ?

मुला–मुलीचा पहिला विवाह असावा, वय विवाहयोग्य असावे, जातीचा दाखला असावा, आधार कार्ड असावे, पालकांची विवाहाला संमती असावी, आदी प्रमुख अटी आहेत.

# प्रिस्क्रिप्शनशिवाय शहरात मिळते औषधी

## औषध व सौंदर्य प्रसाधन कायद्याचे सर्रास उल्लंघन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** दुकानातून प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री करणे हे कायद्याच्या विरोधात आहे. प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने कारवाई केली जाते. प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री करणे हे औषध व सौंदर्य प्रसाधन कायद्याचे उल्लंघन आहे. मात्र अमरावती जिल्ह्यात काही परवाना प्राप्त औषधी दुकानातून डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधाची विक्री केली जात आहे मात्र असे असले तरी संबंधित दुकानावर कारवाई करण्यात आली नाही.शहरासह ग्रामीण भागातही अनेक ठिकाणी आता परवाना प्राप्त औषधांची दुकाने आहेत. सर्दी, खोकला, ताप, हातपाय दुखी, अंगदुखी याशिवाय विविध प्रकारच्या दुखण्यांवर मलम व औषधी तसेच गोळ्यांची रुग्णांकडून दुकानदारांकडे मागणी केली जाते. विक्रेतेही डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री करीत असल्याचे दिसून येते. या सर्व प्रकाराची प्रशासनाला माहिती असूनही कारवाई केली जात नसल्याचे दिसून येते.

### प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधी देण्यास मनाई

डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री करता येत नाही. काही औषध विक्रेते डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन नसेल तर ग्राहकांना परत पाठवतात. मात्र अशा औषध विक्रेत्यांची संख्या नगण्य आहे.




# महाराष्ट्रातील वाघ बहेलियांच्या रडारवर!

## राज्याला रेड अलर्ट !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** : दहा वर्षांपूर्वी राज्यात अवघ्या तीन महिन्यात एक नाही तर तब्बल १९-२० वाघांची शिकार करणाऱ्या मध्यप्रदेशातील बहेलिया शिकाऱ्यांचा पुन्हा एकदा महाराष्ट्रात शिरकाव झाला आहे. या शिकारी जमातीचा म्होरक्या अजित राजगोंड याला महाराष्ट्र वनविभागाने ताब्यात घेतले आहे. या कारवाईनंतर राज्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातून वाघांच्या शिकारीचे सत्र उघडकीस आले. घटांग येथून झालेल्या वाघाच्या शिकार प्रकरणात शिकाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्रात एक नाही तर तब्बल १९ वाघांची शिकार केल्याचे अधिकृतरित्या सांगण्यात आले, पण त्यावेळी यापेक्षाही अधिक वाघांची शिकार झाल्याचे वाघांचे संरक्षक सांगत होते. तर वनखात्यातील काही अधिकाऱ्यांनीसुद्धा याला अप्रत्यक्षपणे दुजोरा दिला. त्यावेळी याप्रकरणात सुमारे १५० शिकारी व आरोपींना अटक करण्यात आली. हे सर्व शिकारी मध्यप्रदेशातील वाघांची शिकार करणाऱ्या बहेलिया शिकारी



गँगमधील असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचा पाठपुरावा करून आरोपींना अटक करण्यात त्यावेळी स्थापन झालेल्या मेळघाट वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली.

अजित, केरू आणि कुट्टू हे तीनही सख्खे भाऊ वाघांच्या शिकारीत तरबेज होते. अजित हा त्यावेळी नागपूर आणि परिसरात झालेल्या वाघाच्या शिकारीत मोस्ट वॉन्टेड होता. वाईल्डलाईफ क्राईम कंट्रोल ब्युरोला माहिती दिल्यानंतर २०१४-१५ मध्ये त्याला तिरुपती येथून अटक करण्यात आली. हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यात आले. अजितला याप्रकरणात शिक्षा झाली. ही शिक्षा पूर्ण करून तो बाहेर पडला. त्यानंतर अजितला १८ जुलै २०२४ ला मध्यप्रदेश वनखात्याने अटक केली. सप्टेंबर २०२४ मध्ये तो जामिनावर बाहेर आला. आता २५ जानेवारीला महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथे महाराष्ट्र वनविभागाने त्याला ताब्यात घेतले.

### अजित, केरू, कुट्टू हे कोण?

अजित, केरू, कुट्टू हे तिघेही सख्खे भाऊ असून तिघेही वाघांच्या शिकारीत तरबेज होते. मध्यप्रदेशातील कटनी येथून केरुच्या अटकेसाठी गेलेल्या वनाधिकाऱ्यांना केरू सापडला नाही, पण कुट्टू हाती लागला. केरुची बायकोदेखील या शिकार प्रकरणात सामील होती. अजित, कुट्टू यांना अटक करण्यात यश आले, पण केरू शेवटपर्यंत वनखात्यातील अधिकाऱ्यांच्या हाती लागला नाही. राष्ट्रपती या नावाने प्रसिद्ध असलेल्या वाघाची शिकार पवनी डॅम परिसरात केरूने केली होती.

### वाघांच्या अवयवांची किंमत किती?

२०१२-१३ साली वाघाच्या कातडीसाठी सुमारे पाच लाख रुपये आकारले जात होते. या दहा वर्षांत ही किंमत दुप्पट झाली आहे. वाघाच्या कातडीसाठी १५ लाख रुपये आकारले जात आहे. तर हाडांसाठी १२ ते १५ लाख रुपये आकारले जात आहे. त्यामुळे एका वाघाची किंमत सध्याच्या परिस्थितीत किमान २५ लाख रुपये आहे.

# 'कोण किती कमावत, त्यापेक्षा समाजासाठी किती...'

## मोहन भागवतांचा विद्यार्थ्यांशी संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ भिवंडी-** देश प्रगती करत आहे विश्वात देशाचा गौरव होत आहे हा सन्मान फक्त आणि फक्त देशातील सजक नागरिकांमुळे शक्य होत आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले आहे.



ते भिवंडी येथील पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ध्वजारोहण प्रसंगी बोलत होते.या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे संस्थाध्यक्ष विजय जाधव,कार्याध्यक्ष बी डी काळे,उपाध्यक्ष अरुणा जाधव,सरचिटणीस रोहित जाधव,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीराम भोईर, मुख्याध्यापक सुधीर घागस उपस्थित होते. तर कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी आरएसएस संघ स्वयंसेवक, प्रतिष्ठित नागरिक,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.'या संस्थेचे संस्थापक अण्णासाहेब जाधव यांनी त्यागपूर्वक समाजासाठी कार्य केले. असेच अनेकांनी देशासाठी त्याग केला आज आपण आपल्या कर्तव्यासह जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. प्रत्येकाने आपापल्या परंपरांची जपणूक करीत बंधुभावाने जगणे हाच खरा धर्म आहे', असे मोहन भागवत म्हणाले. 'समाजाचे सहयोग घेऊन समाजासाठी कार्य करणे हाच खरा धर्म आहे.देश पुढे जात असताना येथील भारतीयांची प्रतिष्ठा वाढली असून कोण किती कमावत त्यापेक्षा समाजासाठी किती वाटतो त्यावर माणसाची प्रतिष्ठा ओळखली जाते असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीत यश मिळवून त्याचा समाजासाठी उपयोग करावा', असा संदेश मोहन भागवत यांनी विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेतर्फे विजय जाधव यांनी डॉ मोहन भागवत यांना रामलल्लाच्या मूर्ती सोबत संस्थापक अण्णासाहेब जाधव यांचे चरित्र भेट देऊन त्यांचा सन्मान केला. तर प्रास्ताविकात कार्याध्यक्ष बी. डी. काळे यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा परिचय दिला.

# शिक्षण मंडळाच्या सर्व परीक्षांवर बहिष्कार

## आयएएस अधिकाऱ्यांना परीक्षा समजतात काय? शिक्षकांचा थेट सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६वर्धा : -** राज्य शिक्षण मंडळातर्फे दहावी, बारावीच्या परीक्षा घेतल्या जात असतात. त्या आता अडचणीत येण्याची चिन्हे आहेत. मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय शिक्षक संघटना अमान्य करीत आहे. असे निर्णय ग्रामीण पातळीवार कसे अंमलात आणणार हे आयएएस अधिकाऱ्यांना समजते काय, असा थेट सवाल करीत मुख्याध्यापक व अन्य संघटनानी बहिष्कार अस्त्र उपसले आहे.

दहावी व बारावीच्या परीक्षा संबंधित शाळा केंद्रातील केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, शिक्षकेतर यंत्रनेत बदल करून घ्याव्या, असे निर्देश आहे. म्हणजे परीक्षा केंद्रात त्याच शाळेतील स्टाफ नकोच. पण हा निर्णय म्हणजे शिक्षक वर्गावर अविश्वास दाखविण्याचा प्रकार व त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करणारा ठरतो. म्हणून हा निर्णय रद्द करावा, अशी मागणी आहे. एका पत्रातून परीक्षा प्रक्रिया व पेपर तपासणी यावर बहिष्कार टाकण्यात येइल असा इशारा देण्यात आला. इशारा मिळताच प्रशासनाने चर्चा केली. यातून काय मार्ग काढता येइल, यावर विचार झाल्याचे शिक्षक नेत्याने सांगितले.

विदर्भ मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सतीश जगताप याबाबत म्हणाले, की शिक्षक संघटना नेहमी सहकार्य करण्याच्या भूमिकेतच असतात. पण आता शिक्षकांवर अविश्वास दाखविण्याचा प्रकार घडत आहे. परीक्षा केंद्रावर त्याच शाळेतील नव्हे तर अन्य शाळेतील शिक्षक परीक्षा घेतील, असा आदेश. पण अन्य शाळेतील शिक्षक नेमले तर ते वेळेवर पोहचणार का, त्यांना प्रवास भत्ता मिळणार का, त्यांच्या



शाळेतील अध्यापन व अन्य जबाबदाऱ्या कोण सांभाळणार, याचे उत्तर दिले गेले पाहिजे. आम्ही शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊ. पण अडून राहण्याची भूमिका दिसल्यास बहिष्कार टाकणार. शिक्षक वर्गात असंतोष आहे. परीक्षा घेणे व परत शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना शिकविणे शक्य नाही. दीड महिना शाळा बंद ठेवायची का, असा प्रश्नही त्यांनी केला.

# श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे भव्य अन्नदान व वस्त्रदान सोहळा

## अध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात गाडगेबाबांच्या कर्मभूमीतील १२० वर्षांची परंपरा कायम

**.विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर** -मानवतेचे थोर सेवक वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांची कर्मभूमी असलेल्या, श्री डेबूजी उर्फ गाडगे महाराज लक्ष्मीनारायण संस्थान आमला श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे हजारो दीनदुबळ्या अंध-अपंग व वृद्ध मायबापांकरिता भव्य अन्नदान व वस्त्रदानाचा दिमाखदार सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात या ठिकाणी पार पडला. प्रामुख्याने विदर्भातील ऋणमोचनला आदीनकाळापासूनच आगळच महात्म्य आहे. संत






गाडगेबाबांनी गृह त्यागानंतर सेवा कार्याची प्रेरणा घेत, सर्वप्रथम या ठिकाणी नदी काठावर कोरडी माती टाकून घाट बांधले. विशेषतः सन १९०५ पासून या यात्रेत येणाऱ्या दीनदुबळ्या अंध-अपंग,कुष्ठरोगी, निराधार वृद्ध मायबापांना अन्नदान व वस्त्रदान केले जात होते. तेव्हापासून आजपर्यंत हा सेवाभावी सोहळा अविरत अखंडितपणे यशस्वीरित्या सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा ऋणमोचन संस्थेचे अध्यक्ष नागरवाडी इंद्रभुनाचे शिल्पकार बापूसाहेब देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व्यवस्थापक वसंतराव देशमुख, संचालक सागर देशमुख यांच्या आयोजनातून अन्नदान व वस्त्रदानाचा सोहळा २६ जानेवारी रविवारला अतिशय सुनियोजनातून पार पडला.प्रामुख्याने अमरावती व अकोला येथील व्यापारी मंडळींकडून वस्त्रदान तसेच दर्यापूर मूर्तिजापूर अकोला येथील दानशूर मंडळी कडून



अन्नदानाकरता मोलाचे सहकार्य लाभले. समाज प्रबोधनकार भरत महाराज रेळे व परिवार यांचेकडून आलेल्या सर्व भाविक भक्तांकरिता चहा बिस्कीट ब्रेड ची व्यवस्था तसेच संत अंबादास महाराज संस्थान कान्होली तर्फे शुद्ध पिण्याच्या बिसलरी बॉटलची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली होती. या अन्नदान व वस्त्रदान सोहळ्याकरता संपूर्ण विदर्भातूनच नव्हे महाराष्ट्रभरातून अंध-अपंग कुष्ठरोगी निराश्रीत वृद्ध मायबाप श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे हजारोंच्या दाखल झाले होते. दरम्यान बडनेरा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार रवी राणा यांच्या विशेष उपस्थितीत पुरुषांना धोतर सुंदर शर्ट, महिलांना लुगडे, साड्या, उबदार ब्लँकेट्स आदींचे वितरण करत सुंदर मिष्ठान्नाचे भोजन देण्यात आले.तदनंतर संस्थेचे सर्वेसर्वा बापूसाहेब देशमुख यांनी गोपाला गोपाला देवेकानंदन गोपालाचा गजर करत या भव्य-दिव्य अन्नदान व वस्त्रदानाच्या सोहळ्याकरता उपस्थित दानशूर मंडळींचे त्यांनी आभार मानले.या कार्यक्रमाला अमरावती, अकोला, मूर्तिजापूर, दर्यापूर येथील व्यापारी मंडळींसह व्यवस्थापक वसंतराव देशमुख, गजानन देशमुख, सुखदेवशेठ भुतडा, दीपक बाबू कासट, समाज प्रबोधनकार भरत महाराज रेळे रुग्णसेवक प्रशांत देशमुख,संचालक सागर देशमुख, व्यवस्थापक कुणाल देशमुख, प्रकाश महात्मे, दिनेश पाटील,प्रवीण देशमुख, प्रा.डॉ.अरविंद देशमुख, प्रभाकर खोपे, गजानन जवंजाळ,माजी मुख्याध्यापक किशोर चौधरी, आदींसह पंचक्रोशीतील श्री बाबांची भक्तमंडळी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होती. सरतेशेवटी या अन्नदान व वस्त्रदानाच्या सोहळ्यातून दीनदुबळ्या अंध-अपंग वृद्ध मायबाप व गरजूंच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने आनंद पाहायला मिळाला.-

# अवैध उत्खननाला चाप

## महसूल विभागाची कार्यवाही ७० लाखाचा दंड आकारला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती-** अमरावती तालुक्यात अवैधरित्या उत्खनन व विना रॉयल्टी वाहतूक करणाऱ्याविरोधात अमरावती तहसील कार्यालयाद्वारे आर्थिक वर्षात वर्षभरात ४०० पेक्षा जास्त वाहनांची तपासणी करून ४० केसेस करून ७० लाखांचा दंड तहसील कार्यालयाने ठोकला आहे. त्यापैकी ५ प्रकरणांत वेगवगळ्या पोलिस ठाण्यांत फौजदारी गुन्हे नोंदविले.यात, ३० लाख रुपये वसूल केला आहे.तालुक्यात मंडलाधिकाऱ्यांच्या नियंत्रणात १२ पथके तयार केली आहेत, त्याचे नियंत्रण प्रमुख हे तहसीलदार आहेत. प्रत्यक्ष कार्यवाही दरम्यान नायब तहसीलदार



टीना चव्हाण आहेत.महसुल विभगाच्या वतीने अमरावती तालुक्यात २४ तास पथके सतर्क असून, तालुक्यात ज्या ठिकाणी अवैध उत्खनन असो की वाहतुकीची तत्काळ माहितीही प्रशासनाला देण्यात येते व लगेच संबधितावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येते, अशी माहिती अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे यांनी दिली.

# शहरात का वाढले असेल अनधिकृत रिक्षास्टँड

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७अमरावती** - शहरात ऑटॉची संख्या हजाराच्या घरात असून बसस्थानकासह शहरात सुमारे ५० ते १०० ठिकाणी अनधिकृत ऑटोस्टँड आहेत. शहरातील चौकाचौकांत रिक्षा थांबे पाहायला मिळतात; पण रिक्षा थांब्यांसाठी कोणाचीही परवानगीच घेतली जात नसल्याचे उघड झाले आहे.



शहरातील चौकात ऑटो उभे केले की झाला रिक्षा थांबा, अशीच सर्वत्र स्थिती पाहायला मिळते. शहरात दिवसेंदिवस रिक्षांची संख्या वाढत आहे. त्यामुळे रिक्षा उभ्या करायच्या तरी कुठे, असा प्रश्न निर्माण होतो. मग, आठ-दहा रिक्षाचालक एकत्र येत एखादी संघटना स्थापन करतात आणि शहरातील मोक्याच्या ठिकाणी, मुख्य चौकात, एसटी स्थानकाबाहेर लावून रिक्षा थांबा सुरू करतात; पण थांब्यासाठी कोणाचीही परवानगी घेतली जात नसल्याचे दिसून येते.अमरावती शहराचे झपाट्याने विस्तारीकरण होत आहे तसेच हे विभागाचे ठिकाण आहे.विविध कार्यालये याठिकाणी झाल्याने नागरिकांची रेलचेल वाढली आहे. व्यवसायाच्या दृष्टिकोनातून ऑटो चालकांची संख्यादेखील प्रचंड वाढली आहे.

# मराठवाड्याच्या प्रवेशद्वारात बर्ड फ्लूचा शिरकाव; दहा किमी परिसर अलर्ट झोन घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
दि.२७नांदेड : २८

लोहा तालुक्यातील किवळा येथे सहा दिवसांपूर्वी मृतावस्थेत आढळलेल्या कोंबड्यांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत. या कोंबड्यांचा बर्ड फ्लूमुळे मृत्यू झाल्याचं अहवालातून निष्पन्न झालं आहे. त्यामुळे किवळा परिसर अलर्ट झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे.

लोहा तालुक्यातील किवळा परिसरात कोंबडी तसेच काही ठिकाणी कावळे मृतावस्थेत आढळले. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत मृत कुकुट पक्ष्यांचे नमुने गोळा राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे आणि भोपाळ येथील कृषी अनुसंधान परिषद, राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था या प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. हे नमुने पॉझिटिव्ह आले असून कुकुट पक्ष्यांचा बर्ड फ्लूमुळे मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं आहे. खबरदारीच्या उपाययोजना म्हणून ५६५ कुकुट पशुसंवर्धन विभागानं ताब्यात घेतले आहेत. बर्ड फ्लूचा संसर्ग टाळण्याकरिता त्यांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रभावित क्षेत्रात जिवंत अथवा मृत कुक्कुट पक्षी, अंडी, कोंबडीखत, पक्षीखाद्य, इतर संबंधित साहित्य आणि उपकरणांच्या वाहतूकीला मनाई करण्यात आली आहे.

प्रभावित पोल्ट्री फार्मच्या परिसरात नागरिकांना जाणे, तसेच इतर पक्षी आणि प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात



आला आहे. प्रभावित पोल्ट्री फार्मचे प्रवेशद्वार आणि परिसर २ टक्के सोडियम हायपोक्लोराईट किंवा पोटॅशियम परमॅग्नेटने निर्जंतुकीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रभावित क्षेत्राच्या ५ कि.मी. त्रिज्येतील परिसरात कुक्कुट पक्ष्यांची खरेदी-विक्रीची दुकाने, कुक्कुट मांसाची चिकन दुकाने, वाहतूक, बाजार आणि यात्रा, प्रदर्शन आदी बाबी बंद राहतील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात म्हटलं आहे.

### नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी काय काढले आदेश?

जिल्ह्यात बर्ड फ्लूचा उद्भव झाल्याचं स्पष्ट झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाचे आदेश काढले आहेत. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या आदेशानुसार किवळा येथील दहा किलोमीटर परिसरात जिल्हा प्रशासनाच्या वतीनं अलर्ट झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे.

नुकतेच लातूर जिल्ह्यात बर्ड फ्लूमुळे ५१ कावळे मृत्युमुखी पडल्यानंतर बर्ड फ्लूचा संसर्ग रोखण्याकरिता लातूर जिल्ह्यातदेखील प्रयत्न सुरू आहेत. लातूर पाठोपाठ नांदेडमध्ये बर्ड फ्लूची लागण झाल्यानं पोल्ट्री फार्म व्यवसायिकांची चिंता वाढली आहे.

### बर्ड फ्लू मानवाला होऊ शकतो का?

बर्ड फ्लूची लागण ही वन्य, जलचर पक्षी, पाळीव कोंबड्या आणि इतर पक्षी आणि प्राण्यांच्या प्रजातींना होते. असे असले तरी बर्ड फ्लूचा संसर्ग मानवांमध्येही होऊ शकतो. अशा प्रकारचे काही रुग्ण जगभरात आढळले आहेत. बर्ड फ्लूची लागण झालेल्या प्राणी अथवा पक्ष्याच्या संपर्कात किंवा संसर्ग झालेल्या वातावरणात आल्यानं मानवालाही बर्ड फ्लूची लागण होऊ शकते. बराच काळ बर्ड फ्लूचा संसर्ग असलेल्या पाण्याच्या संपर्कात असल्यानं बर्ड फ्लू होऊ शकतो.

# मुंबई ते प्रयागराज जितका विमान प्रवास दर तितक्या खर्चात परदेशात जाल; डीजीसीए हैराण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७प्रयागराज**



तब्बल १४४ वर्षांनी भरलेल्या महाकुंभ मेळ्यात कोट्यवधीच्या संख्येने भाविक येत आहेत. आतापर्यंत ११ कोटीहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केले आहे. देशातच नाही तर परदेशातूनही मोठ्या श्रद्धेने भाविक प्रयागराज इथं येत आहेत. महाकुंभसाठी होणारी गर्दी जशी वाढत आहेत तसा इथे येणारा विमान प्रवासही महागला आहे. दिल्ली अथवा मुंबईतून प्रयागराजला पोहचण्यासाठी विमानाचं तिकिट इतकं महागलं आहे ज्यात तुम्ही सिंगापूर, दुबई, लंडनसारखे देश फिरून याल. प्रयागराजला हवाई प्रवासाने जाण्यासाठी ५० ते ६० हजार रुपये मोजावे लागत आहेत.

महाकुंभ मेळ्यात पवित्र स्नानाच्या दिवशी फ्लाईट तिकिट सर्वाधिक दराने विकली जात आहे. १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या महाकुंभ मेळ्यात २९ जानेवारी, ३ फेब्रुवारी, १२ फेब्रुवारी यासारख्या दिवशी दिल्ली, मुंबईहून प्रयागराजला येणाऱ्या विमानाचे तिकिट दर गगनाला भिडलेत. सामान्य दिवशी दिल्लीतून प्रयागराजला जाण्यासाठी १०-१२ हजार रुपये दर आकारले जातात तर मुंबईतून प्रयागराजला जाण्यासाठी १५ हजारांपर्यंत दर घेतला जातो. परंतु शाही स्नानाच्या दिवशी महाकुंभ मेळ्यात जाणाऱ्यांना दिल्लीतून प्रयागराज ५० हजार रुपये आणि मुंबईतून ५०-६० हजार रुपये तिकिट दर आकारले जात आहेत.

विशेष म्हणजे दिल्ली ते लंडन ३ फेब्रुवारीला विमानाचे तिकिट दर ३०-३५ हजार इतके आहेत. दिल्ली सिंगापूर प्रवासाचा दर २४-२५ हजार रुपये आहे. महाकुंभसाठी विमान तिकिट दरात वाढ पाहून लोकांनी या कंपन्यांवर अंकुश लावण्याची मागणी सरकारकडे केली आहे. विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते विनोद बन्सल यांनी वाढणाऱ्या तिकिट दराकडे लक्ष वेढत सरकारकडे ते कमी करण्याची मागणी केली आहे. प्रयागराजला येणाऱ्या भाविकांसाठी सुरक्षा, सुविधा यांचं राज्य सरकार लक्ष ठेवत आहे परंतु काही विमान कंपन्या यातून संधी शोधत दरात वाढ करत आहेत ते अयोग्य असल्याचं विश्व हिंदू परिषदेने म्हटलं.

दरम्यान, महाकुंभसाठी भारतीय रेल्वेकडून विशेष गाड्या सोडल्या जातायेत, त्यात प्रवाशांसाठी सुविधेसह तिकिट दर मर्यादित ठेवले आहेत. विमान कंपन्यांनी इकोनॉमी क्लाससाठी २०० ते ७०० टक्के तिकिट दरात वाढ केलेत. त्यामुळे भाविकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विश्व हिंदू परिषदेने केलेल्या मागणीकडे लक्ष देत विमान वाहतूक नियामक(ऊग्रछ-) अलर्ट झालं आहे. महाकुंभसाठी प्रयागराजला येणाऱ्या विमान तिकिट दरावर विचार करावा असं त्यांनी सांगितले. तसेच भाविकांची वाढती मागणी पाहून ८१ अतिरिक्त उड्डाणांना परवानगी देण्यात आली आहे.

# मंत्र्यांकडून घटनास्थळाची पाहणी, जखमींची चौकशी कामगारांच्या कुटुंबीयांना नोकरीची हमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७भंडारा**

येथील लक्ष रुग्णालयात पालकमंत्री संजय सावकारे, कामगार मंत्री फुंडकर तसेच स्थानिक आमदारांनी अधिकाऱ्यांसह जावून जखमी कामगारांची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा करून प्रकृतीची चौकशी केली. डॉक्टरांकडून प्रकृतीचा अहवाल जाणून घेतला.

शनिवारी कामगार मंत्री फुंडकर आणि भंडाऱ्याचे नवनियुक्त पालकमंत्री संजय सावकारे यांनी दुपारी ४ वाजता संयुक्तपणे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्यांनतर आयुध निर्माणीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तत्पूर्वी येथील विश्रामगृहावर मंत्र्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षकांशी चर्चा केली. यानंतर आयुध निर्माणी येथे गेल्यावर या दोनही मंत्र्यांनी तिथल्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन माहिती व घटनाक्रम जाणून घेतला.

पालकमंत्री व कामगार मंत्र्यांनी आयुध निर्माणी व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. भविष्यात अश्या दुर्घटना टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश कामगार मंत्री फुंडकर यांनी दिले. मृतांच्या कुटूंबियांना द्यावयाच्या अर्थसहाय्याबद्दल माहिती दिली.शनिवारी कामगार मंत्री फुंडकर आणि भंडाऱ्याचे नवनियुक्त पालकमंत्री संजय सावकारे यांनी दुपारी ४ वाजता संयुक्तपणे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्यांनतर आयुध निर्माणीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तत्पूर्वी येथील विश्रामगृहावर मंत्र्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षकांशी चर्चा केली. यानंतर आयुध निर्माणी येथे गेल्यावर या दोनही मंत्र्यांनी तिथल्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती व घटनाक्रम जाणून घेतला.

## सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही भरत गोगावले समर्थक आमदारांनी रणशिंग फुंकलं!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ रायगड**

जिल्ह्यात राष्ट्रवादी आणि शिवसेनेमध्ये पालकमंत्रिपदावरुन सुरू झालेला वाद आता आणखी विकोपाला गेल्याचं दिसून येतंय. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरेंच्या पालकमंत्रिपदाला शिंदेंच्या शिवसेनेचा विरोध कायम आहे. शिंदेंचे आमदार महेंद्र दळवींनी खासदार सुनील तटकरेंवर जोरदार टीका केली आहे. आगामी काळात सुनील तटकरेंना जिल्ह्यात फिरु देणार नाहीत असा इशाराच आमदार महेंद्र दळवींनी दिला आहे. तर लवकरच भरत गोगावलेंना रायगडचे पालकमंत्रिपद मिळणार असल्याचं भाकितही त्यांनी केलं. अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथे स्वर्गीय प्रमोद केशव ठाकूर प्रवेशद्वार नामकरण सोहळ्याचे उद्घाटन प्रसंगी पुन्हा एकदा शिंदे सेनेच्या आमदारांकडून खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीकास्त्र सोडण्यात आलं.

# अमरावती विभागात प्रथमच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे अँटेना डिझाइन कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**



आधुनिक दूरसंचार तंत्रज्ञानामुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. वायरलेस कम्युनिकेशनमुळे

कोट्यवधी लोकांना व्हॉइस आणि डेटा सिग्नलद्वारे जोडणे शक्य झाले आहे. हा वायरलेस

कम्युनिकेशन एवढा शक्तिशाली बनला आहे तो केवळ त्याच्या महत्त्वाच्या घटकामुळे म्हणजेच

'अँटेना'मुळे. दळणवळणाच्या क्षेत्रातील उदयोन्मुख मागणी लक्षात घेता, कार्यक्षम अँटेना डिझाइन करणे ही आजची प्रमुख गरज आहे. म्हणून, अँटेनाचा व्यावहारिक तथा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार विभाग, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांनी ठऋ

Aqua Solutions, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "Design, Fabrication and Field Testing ofoutdoor antenna and Radar equipments39; या विषयावर दि. १६ ते १८ जानेवारी २०२५ दरम्यान तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.

कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अँटेना डिझाइनची व्यावहारिक मूलभूत तत्त्वे जाणूनघेऊन स्वत: हातांनी अँटेना बनविणे हा होता. अतिथी वक्ते श्री अनिरुद्ध कुलकर्णी आणि श्री मुकुंद भोपळे यांनी अँटेना डिझाइन पद्धती, अँटेना आणि रडारशी संबंधित विविध संज्ञा, पाण्याखालील सबमर्सिबल इलेक्ट्रॉनिक्स या विषयांवर प्रामुख्याने भर दिला. विद्यार्थ्यांनी Sky wave propagation साठी स्वत: अँटेना डिझाईन, फॅब्रिकेशन आणि चाचणी यशस्वी रित्या करून दाखविली. कार्यशाळेने अँटेना डिझाइनच्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलूंचे संतुलन राखण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले.अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत सुमारे ५६ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. एस. जे. मेश्राम, समन्वयक, डॉ. पी. आर. देशमुख, विभाग प्रमुख (इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार विभाग), प्रा. आर. आर. हरणे, श्री. आर. के. वानखेडे यांनी सदरील कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.डॉ. ए. एम. महल्ले, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांनी कार्यशाळा यशस्वी करणाऱ्या प्रामाणिक प्रयत्नांबद्दल समन्वयक, केऌ आणि कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# प्रफुल्ल देशमुख यांची जिल्हा परिषद शाळेला १० लाखांची भेट प्रेरणादायी : इंटरक्टीव्ह पॅनलचे आमदारांचे हस्ते लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ चांदूर रेल्वे**




दिनांक २६ जानेवारी रोजी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मांजरखेड कसबा येथे आठ इंटरक्टीव्ह पॅनलचे लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रताप अडसड व मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र,प्रफुल्ल देशमुख यांचे हस्ते आठ वर्ग खोलीत इंटरक्टीव्ह पॅनलचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री पाताळेश्र्वर व गुप्तेश्र्वर देवस्थानचे अध्यक्ष नरेंद्रपंत देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी आयोजित कार्यक्रमाला गटविकास अधिकारी तेजश्री आवळे, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, पंचायत समिती माजी सभापती प्रशांत भेंडे, विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, विलास बाबरे, सरपंच पल्लवी देशमुख, माजी सरपंच शैलेश देशमुख, अमोल देशमुख, दिलीप गुल्हाने, संजय सव्वालाखे, अशोक देशमुख शाळा व्यवस्थापन समितीचे विनोद भोगे, लक्ष्मी नेमाडे, हाफिज काजी, मोहंमद तन्वीर, विषयतज्ञ श्रीनाथ वानखडे, नामदेव मार्डीकर ,अमोल चौकडे आदींची प्रमुख उपस्थिति होती.

**मुलाचा अभिमान**

गावातील मुलांच्या शिक्षणासाठी शाळेला प्रफुल्लने केलेले सहकार्य ही निश्चितच गौरवाची बाब आहे, पण यासोबत समाजातील कुठल्याही व्यक्तीच्या सहकार्यासाठी तो सदैव पुढाकार घेतो याचा मला वडील म्हणून कायम अभिमान असल्याचे गौरवोद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र देशमुख यांनी काढले.

कार्यक्रमाचे संचालन प्रशांत उंडे यांनी केले तर आभार संदीप बोडखे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक प्रशांत उंडे, मिर्जा गफ्फार बेग, अनिल भरोसे, माधुरी बुटे, संगीता आंबटकर, माधुरी थोरात, राम महाजन, मोहम्मद इरशाद, इम्राना मॅडम, प्रगती देशमुख, मोहसीना काजी, श्रीकृष्ण शिरभाते आदींनी सहकार्य केले.

## दानशूरांची भूमिका महत्वाची



जिल्हा परिषदेतील अनेक विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतात. त्यांचं शिक्षण सुलभ होण्यासाठी समाजातील अनेक दानशुर व्यक्तींची भूमिका मोलाची आहे. प्रफुल्ल देशमुख यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी म्हटले.

## कल्पना शक्तीचा विस्तार



इंटरक्टीव्ह पॅनलद्वारे मुलांच्या कल्पना शक्तीला वाव मिळणार असल्याने त्यांच्या कौशल्यांचा विस्तार होणार आहे. शिक्षकांनी तंत्रज्ञानचा वापर करून विद्यार्थ्यांचा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन उद्घाटक आ. प्रताप अडसड यांनी केले.

# विद्यापीठाची हिवाळी-२०२४ एम.एस्सी. सेमि.१ बॉटनी अभ्यासक्रमाची पुनर्परीक्षा ५ फेब्रुवारी रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी-२०२४ एम.एस्सी. सेमिस्टर-१ (बॉटनी) (एन.ई.पी.) (जुना अभ्यासक्रम) अभ्यासक्रमातील बॉट१०१ सेल ॲन्ड मॉलेक्युलर बॉयलॉजी या विषयाच्या परीक्षेमध्ये प्रश्नपत्रिकेच्या एकुण गुणांमध्ये तफावत असल्याबाबतची तक्रार विद्यापीठाकडे प्राप्त झाली होती.



विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर विषयाची पुनर्परीक्षा बुधवार दि. ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दु. १२.०० या वेळेत विद्यार्थ्यांना यापूर्वीच देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवावे आणि काही अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांच्याशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्कसाधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी दिली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचा ७६ प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजस्तंभस्थळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, श्री राजेश पिदडी उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या रोजगार, सुरक्षा, कौशल्य विकास आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यापीठातून इंटर्नशिपसाठी ३० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी विद्यापीठस्तरीय रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी जेंडर ऑडिटचा उपक्रम राबवला जात आहे. कबड्डी स्पर्धा, स्मार्ट हॅकथॉन, आविष्कार संशोधन स्पर्धा यांसारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींशी वार्तालाप सुध्दा केला जातो. विद्यापीठाच्या खेळाडूंनी अखिल भारतीय आणि पश्चिम विभागीय स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करून विद्यापीठाचे नाव उज्वल केले. याशिवाय विद्यापीठातील प्राध्यापकांनी संशोधनातही उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाले आहेत.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठामध्ये दर्शनीय स्थळी संविधान शिल्प उभारण्यात आले असून त्याचा विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजामध्ये संदेश पोहचला जात आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह शालेय विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती व्हावी, यासाठी स्कुल कनेक्ट कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्या जात असून आव्हान चान्सलर ब्रिगेड २०२४ महाराष्ट्र स्तरीय स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन विद्यापीठामध्ये करण्यात आले. यादरम्यान विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणातून विद्यार्थी सक्षम होऊन संकटकाळी विद्यार्थी निश्चितच मदतकार्य करतील असे साांगून सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, सर्व संवैधानिक अधिकारी, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती वरून हजारो भक्त निघाले प्रयागराच्या महाकुंभ मेळाव्याला...







आमदार रवी राणांनी दाखवली झेंडी..आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा येत्या ७ किंवा ८ फेब्रुवारीला हजारो भक्तांसह प्रयागराजला जाणार आहेत. .. राणा दाम्पत्य प्रयागराज ला करणार कुंभमेळ्यात गंगास्नान करणर आहेत. आमचा पक्ष जवळपास ५ हजार लोकांना कुंभ स्नान करण्यासाठी नेणार आहे..दररोज दोन ते तीन बस जाणार अयोध्याला देखील भाविकांना नेणार.पाच ते सात टँकर प्रयागराज वरुन कुंभ स्नान आपण आणणार आहोत आणि बॉटलच्या माध्यमातुन जिल्ह्यातील लोकांना वितरीत करणार आहेत.

## सायन्सकोर मैदानात सुरु असलेल्या मिनी सरस प्रदर्शनीला रविवारी मिळाला उस्फुर्त प्रतिसाद : लाखोंची झाली उलाढाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

बचतगटांच्या विविध समुहांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरिता दरवर्षी प्रदर्शनी घेऊन तसेच इतर जिल्ह्यातील प्रदर्शनीमध्ये स्थानिक बचतगटांना स्थान देण्याचे काम उमेदने केले आहे. अशातून महिला ह्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असून खऱ्या अर्थान काही बचतगटातील महिलांनी या विविध गृह व्यवसायात भरारी घेतली आहे.रविवारी या प्रदर्शनीला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देत खरेदीचा मनसोक्त आनंद लुटला गेल्या तीन दिवसांपासून सायन्सकोट मैदानावर मिनी सरस प्रदर्शनी सुरु आहे रविवार २६ जानेवारी रोजी या प्रदर्शनीत लाखो अमरावतीकरांनी भेट देत अनेक वस्तू खरेदी केल्यात त्यामुळे रविवारी या मिनी सरस प्रदर्शनीत लाखोंची उलाढाल झाली.



सायन्सकोर स्थित या प्रदर्शनीमध्ये जिल्ह्यातील ६५ स्वयं सहाय्यता समूह तसेच इतर जिल्ह्यातील १० स्वयं सहाय्यता समूह असे एकूण ७५ समूहाचे स्टॉल लावण्यात आले आहे. या प्रदर्शनीमध्ये ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ, तसेच इतर आकर्षक वस्तू नागरिकांना खरेदी करिता ठेवण्यात आल्या आहे. विदर्भातील ग्रामीण भागातील मुख्य आकर्षण असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश करण्यात आला आहे.

२८ जानेवारी पर्यंत हे प्रदर्शन चालणार असून नागरीकांना याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे. या प्रदर्शनीमध्ये नागरिकांना मिक्स मिलेट्स कडधान्य, सर्व प्रकारचे मसाले, डिंक लाडू, पंचरत्न लाडू, मोह लाडू, डिंक लाडू, ज्वारी, बाजरी, सोया प्रोडक्ट्स, सोया इडली, ढोकळा, मोरिंगा पावडर, हळद पावडर, सर्व प्रकारची लोणची, खारोडी, मुगवडी, जवस चटणी, खंडू चक्का तेल, शुद्ध देशी गाईचे तूप, गाईचे शेणापासून बनविलेल्या धूपबत्ती, मकरसंक्रांतनिमित्त हलव्याचे दागिने, तीळ-गुडिया व बांबू पासून विविध आकर्षक वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## अमरावतीच्या सोनरी गावात चक्क विद्युत खांबावर बसून शेतकऱ्याचे अनोखे उपोषण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चांदुर बाजार**

घराच्या समोर असलेला रस्त्यावरील विद्युत खांब रस्त्याच्या बाजूला करण्यासाठी विलास चर्जन यांनी चक्क विद्युत पोलवर खाट बांधून जीव धोक्यात घालत सुरू केलं उपोषण. अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील सोनेरी येथील ही घटना आहे.

यापूर्वीही चर्जन यांनी विहिरीत बसून आंदोलन केले होते वारंवार विद्युत खांब काढण्यासंदर्भात तक्रारी करून देखील पोल हटवण्यात न आल्याने चर्जन यांनी अनोख्या उपोषणाला आजपासून सुरुवात केली आहे..या उपोषणामुळे प्रशासनाला जाग येणार का असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झालाय.विशेष म्हणजे महावितरण कंपनीने हा विधुत पोल काढण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

## पत्रकारांसाठी सत्याधीष्टीत पत्रकारिताच खरा कर्मयोग; ज्येष्ठ पत्रकार प्रकाशदादा चौधरी यांचे प्रतिपादन

### अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

सत्याधीष्टीत काम करणे हीच खरी पत्रकारिता असून तोच आपला खरा कर्मयोग आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रकाशदादा चौधरी यांनी केले आहे.अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने रविवार प्रजासत्ताक दिनी राजापेठस्थित श्रमिक पत्रकार भवनात आयोजित पत्रकार पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, ज्येष्ठ समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, दैनिक विदर्भ मतदार चे संपादक ड. दिलीप एडतकर, आयएनएसचे पदाधिकारी व दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, भारतीय जैन संघटनेचे माजी अध्यक्ष सुदर्शन गांग, महापालिकेचे सहआयुक्त भूषण पुसतकर आदी मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्रातील नामवंत लेखक-पत्रकार शिरीष पै, आचार्य अत्रे, मा. गो. वैद्य, पा. वा. गाडगीळ, युधिष्ठिर जोशी, यांचा सहवास लाभलेले लोकमत या दैनिकात अल्पकाळ सेवा दिलेल्या सुरेश भट यांच्यानंतरचे अमरावतीचे ८० च्या दशकातील पहिले जिल्हा प्रतिनिधी प्रकाशदादा चौधरी म्हणाले की, मी शिक्षक असताना हा पेशा स्वीकारला. पुढे मुख्याध्यापक की लोकमतचा जिल्हा प्रतिनिधी, असा पर्याय माझ्या पुढे होता. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेविरुद्ध बंडाची पार्श्वभूमी असल्यामुळे तसेच अन्यायाविरुद्ध लढा हा पत्रकारच देऊ शकतो, या भूमिकेतून स्वाभाविकच मी पत्रकारिता निवडली. पुढे दहा वर्षे त्या पदावर काम करून मग स्वतःचे वृत्तपत्र सुरू केले, असे ९२ वर्षीय प्रकाशदादा चौधरी यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षापूर्वी द्रोपदी मुर्मू राष्ट्रपती झाल्या, तेव्हा मी शेवटचा लेख लिहून माझी लेखणी थांबविली.अशा स्थितीत मी आपणास कसा लक्षात राहिलो हे, माझ्यासाठी अनाकलनीय आहे. तसे पाहिले तर आजचा काळ हा विसरण्याचा आहे. पण श्रमिक पत्रकार संघाने माझी आठवण ठेवली. सगळ्या जुन्या जाणत्या सहकाऱ्यांना भेटण्याचा योग आणला, या शब्दात त्यांनी आभारही व्यक्त केले.मनपा



आयुक्त सचिन कलंत्रे यांनी माध्यम क्षेत्रातील कामे कशी आव्हानात्मक आहे, याची मांडणी केली. विशेषतः वेगवेगळी माध्यमे असतानाही विश्वासार्हता आणि गरज या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रेच अधिक श्रेष्ठ आहेत, हेही स्पष्ट केले. डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियामध्ये बातमी किती वेळा नजरेखालून गेली तरी जोपर्यंत कागदावर समोर येत नाही, तोपर्यंत त्यावर पूर्ण विश्वास बसत नाही, असेही सचिन कलंत्रे म्हणाले. त्यासाठी त्यांनी इंग्लंड, अमेरिकेत चौकाचौकात ज्या पद्धतीने वृत्तपत्र निःशुल्क उपलब्ध होतात, त्याचेही उदाहरण दिले.

ॲड. एडतकर यांनी वृत्तपत्रांचा बदललेला नूर स्पष्ट करून त्यात सुधार आणण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. प्रकाशदादा चौधरी यांचे आणि एडतकर कुटुंबाच्या ऋणानुबंधाला एडतकर यांनी उजाळा दिला. वर्तमानपत्र आज आधी विकली जातात आणि नंतर छापली जातात, असे सांगून या क्षेत्राची स्थिती त्यांनी स्पष्ट केली. अध्यक्ष गोपाल हरणे यांनी वृत्तपत्र क्षेत्रातील प्रतिनिधींच्या मानधनाचा मुद्दा पुढे करून त्यात सकारात्मक बदल आणण्याची गरज व्यक्त केली. स्थानिक पातळीवरील श्रमिक पत्रकार हा आर्थिक विवंचनेतून अद्यापही मुक्त झालेला नाही. त्याला आर्थिक व सामाजिक संरक्षण देण्याची व व्यवस्थेचा पाया असलेल्या श्रमिकांचे कल्याण साधण्याची गरज आहे. यातून चांगला मार्ग भविष्यात निघेल, असाही विश्वास हरणे यांनी व्यक्त केला. प्रकाशदादा चौधरी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन अमरावती श्रमिक पत्रकार संघ कृतज्ञ समजतो, अशी भावनाही याप्रसंगी हरणे यांनी व्यक्त केली.अमरावती विभागीय अधिस्वीकृती समितीचे माजी अध्यक्ष तथा दैनिक प्रतिदिन अखबारचे संस्थापक संपादक नानक आहुजा यांनी त्यांच्या अत्यंत व्यग्र कार्यक्रमातून प्रकाशदादा चौधरी यांची स्नेहील भेट घेतली, प्रकाश दादा चौधरी यांच्या प्रकृतीची आत्मियतेने विचारपूस केली व कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. सुदर्शन गांग यांनीही यावेळी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवून पत्रकारांना भेटवस्तू दिल्या तसेच जैन परिवारातर्फे पत्रकारांचे प्रातिनिधिक स्वरूपात स्वागतही केले.तत्पूर्वी 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमादरम्यान दैनिक हिंदुस्थान प्रायोजित पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे व डॉ. अरुण मराठे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ *प्रभावी पत्रकारिता पुरस्कार* दैनिक प्रतिदिन अखबारच्या बातमीदार मीनाक्षी कोल्हे, दैनिक विदर्भ मतदार प्रायोजित ममता येडतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ *उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार* दैनिक अमरावती मंडलचे चंद्र प्रकाश दुबे यांना, दैनिक जनमाध्यम प्रायोजित दर्पणकार अनिल कुचे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शोध पत्रकारिता पुरस्कार लोकमत समाचारचे नासिर हुसेन यांना तर तख्तगढ राजस्थान येथील स्व. सुमतीदेवी व स्व. डॉ. सोहनमल जैन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उद्योजक (कोल्हापूर) सुरेंद्र जैन यांच्यातर्फे लक्षवेधी पुरस्कार साम मराठी टीव्हीचे अमर घटारे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ आणि सन्मानचिन्ह, असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.या कार्यक्रमाचा मुकुटमणी असलेला हा प्रसंग प्रकाशदादा चौधरी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा होता. त्यांना ३१ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी सर्वांनी उभे होऊन व टाळ्या वाजवून त्यांच्या सन्मानाला उंचीवर नेले.

पत्रकार संघाचे सचिव रवींद्र लाखोडे यांनी प्रास्ताविक केले. कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर यांनी पुरस्कारार्थींचा परिचय करून दिला. संचालन पत्रकार संघाचे कार्यकारीणी सदस्य शैलेश धुंदी यांनी केले. आभार पदाधिकारी महेश कथलकर यांनी मानले. पत्रकार संघाचे सहसचिव प्रदीप भाकरे, कार्यकारिणी सदस्य कृष्णा लोखंडे, संतोष ताकपिरे, प्रवीण कपिले आदींनी अतिथींचे स्वागत केले.यावेळी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष डॉ. कुमार बोबडे, अनिल जाधव, जितेंद्र दोशी, ज्येष्ठ पत्रकार अशोक जोशी, अनिल मुनोत, राजेश राजपूत, गणेश वासनिक, संजय देशमुख, गजानन मोहोड, सुनील चौरसिया, संजय शेंडे, अक्षय येडतकर, भैय्या आवारे, स्वप्नील सवाळे, सुरज दहाट, उज्वल भालेकर, प्रा. कमलाकर पायस, प्रा. संजय खडसे,सनत आहाळे, संदीप शेंडे, राजेश जवंजाळ, दिनेश जामनिक,संजय बनारसे, सुधीर भारती, पवन श्रीवास्तव, दिलीप जवंजाळ, सचदेव, अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पोलिसाचं रेकॉर्डींग व्हायरल करणाऱ्या आठवले गँगवरही मकोका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ बीड**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन सध्या बीड जिल्हा राज्यात चर्चेत असून देशमुख कुटुंबीयांच्या न्यायासाठी अनेक जिल्ह्यात मोर्चेदेखील काढण्यात आले. या प्रकरणामुळे मंत्री धनंजय मुंडेंचे निकवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडचेही नाव राज्यभरात चर्चेत आले असून खंडणी व खून प्रकरणात त्यांच्यावर आरोप होत आहेत. वाल्मिक कराडचे पोलिसांशी हितसंबंध असून पोलिसांकडूनच त्याला बळ देण्यात येत असल्याचेही आरोप जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी केले आहेत. दरम्यान, खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडला अटक केल्यानंतर त्याच्यावर मकोका अंतर्गतही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे, जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट झाली असून बीडमधील आणखी एका गँगकवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलीय. डिसेंबर महिन्यात गोळीबार करणाऱ्या आठवले गँगवर देखील पोलिसांनी आता मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस अधिकारी शितल बल्लाळ यांच्यावर आरोप करत ऑडिओ क्लीप व्हायरल करणाऱ्या सनी आठवलेची ही आठवले गँग आहे.

## गरीब, सामान्य कैद्यांचे दंड, जामिनाची रक्कम सरकार भरणार

### केंद्र शासनाचा पुढाकार : राज्यात प्रभावी अंमलबजावणीसाठी चार सदस्यीय स्वतंत्र समिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी गरीब, सामान्य कैद्यांचे दंड भरणे किंवा जामिनाची रक्कम भरण्यास 'आर्थिक' मदत ही विशेष योजना लागू करण्यात आली आहे. त्याकरिता केंद्र शासनाने पुढाकार घेतला असून, या योजनेची महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी चार सदस्यीय पर्यवेक्षी समिती गठित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने गृह विभागाने १० जानेवारी रोजी शासन निर्णय जारी केला आहे.



**या कैद्यांना मिळेल मदत**

'सपोर्ट टू पुअर प्रीझन' या अंतर्गत मध्यवर्ती, जिल्हा, महिला, खुले कारागृहातील कैद्यांना आर्थिक मदतीचा हात मिळणार आहे. यात गरीब कैदी, सामाजिक दृष्ट्या वंचित, कमी शिक्षित, अल्पउत्पन्न गटातील कैद्यांना लाभ होऊन कारागृहाबाहेर येण्यास मदत होईल.

दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता आणि उपेक्षित दुर्बल घटकातील कैद्यांना केंद्र शासनाच्या 'सपोर्ट टू पुअर प्रीझन' या योजनेची मदत मिळावी, यासाठी राज्य शासनाने चार सदस्यीय समिती गठित केली आहे. यात अध्यक्षपदी पुणे आणि नागपूर कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे, सदस्य म्हणून येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ, नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक वैभव आगे, तर सदस्य सचिव नागपूर कारागृह उपनिरीक्षक कार्यालयाचे उपअधीक्षक दयानंद सोरटे यांचा समावेश आहे. या समितीची कार्यकक्षा शासनाने ठरवून दिली आहे. त्यानुसार दर महिन्याला बैठकीचे आयोजन करून सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा लागणार आहे.

> कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या या योजनेचा कैद्यांना नक्कीच लाभ होईल. त्यानुसार समितीदेखील गठित झाली असून, लवकरच बैठक होईल. गरीब, दुर्बल कैद्यांचे दंड भरणे, जामिनासाठी मदत सरकार करणार आहे.
> **– जालिंदर सुपेकर, आयजी, कारागृह विभाग**

## २.७४ लाख शेतकऱ्यांना मिळणार पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता ई-केवायसी व आधार लिंकिंग केलेल्या २.७४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच जमा करण्यात येणार आहे. त्यानंतरचा २० वा हप्ता मात्र कुटुंबातील फक्त एका व्यक्तीलाच मिळणार असल्याची प्रशासनाची माहिती आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक मदत होण्यासाठी केंद्र शासनाने पीएम किसान योजना डिसेंबर २०२४ पासून सुरू केली. या योजनेत वर्षाला सहा हजार रुपयांची मदत पात्र शेतकऱ्यांना देण्यात येते. यामध्ये वर्षात तीन वेळा प्रत्येकी चार महिन्यांत दोन हजारांचा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो. योजनेचे आतापर्यंत १८ हप्ते जमा करण्यात आलेले आहेत. फेब्रुवारी महिन्यात १९ वा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याची चर्चा प्रशासनात आहे.



**योजनेत तालुकानिहाय पात्र लाभार्थी**

योजनेमध्ये ई-केवायसी व आधार लिंकिंग केलेले २,७३,९७१ शेतकरी आहेत. यामध्ये अचलपूर तालुक्यात २२,६२८ शेतकरी, अमरावती १६,२८७, अंजनगाव सुर्जी १९,३३१, भातकुली १६,१४०, चांदूर रेल्वे १३,८८३, चांदूरबाजार २६,५४६, चिखलदरा १०,५६८, दर्यापूर २४,३२०, धामणगाव १८००२, धारणी १६,५७१, मोर्शी २५,१०६, नांदगाव खंडेश्वर २२,७७०, तिवसा १५,२८७ व वरुड तालुक्यात २६,५३० शेतकरी आहेत.